अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. ९ जानेवारी २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १०२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

तिरुपती बालाजी मंदिरात चेंगराचेंगरी

✔ **नवी दिल्ली :** आंध्र प्रदेशमधील प्रसिध्द तिरुपती मंदिरात टोकन वाटताना झालेल्या चेंगराचेंगरीत चार भक्तांचा मृत्यू झाला आहे. तर १६ जण जखमी झाले आहेत. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार वैंकुठद्वार सर्वदर्शनम टोकन वितरणाच्या दरम्यान हा प्रकार घडला. तिरुपती मंदिरातील विष्णू निवासम परिसरात ही दुर्घटना घडली. हे टोकन घेण्यासाठी भक्तांची मोठी गर्दी झाली होती. त्या गर्दीत चार जणांना दुर्दैवी मृत्यू झाला. तामिळनाडूमधील एका भक्ताचाही या दुर्घटनेत समावेश आहे. या चेंगराचेंगरीनंतर चार जणांना हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या घटनेचा आढावा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून घेतला आहे. या घटनेची माहिती मिळताच परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आले आहे.

सासुरे, राळेरास पट्ट्यात वाघाचा धुमाकूळ!

रेडकू गायब, वासराचा फडशा ! शेतकरी दहशतीत!

✔ **सोलापूर/प्रतिनिधी**

मागील अनेक दिवसांपासून बार्शी तालुक्याच्या उत्तर भागात आपला वावर ठेवलेल्या वाघाने आपला मोर्चा आता वैराग परिसरात वळवला असून मागच्या दोन दिवसांत सासुरे आणि राळेरास शिवारात त्याने धुमाकुळ घालताना राळेरास शिवारात गाईच्या वासरावर हल्ला करीत त्याचा फडशा पाडल्याची माहिती समोर आली आहे, तर सासुरे येथील एका वस्तीवरील म्हशीचे रेडूक गायब झाल्याचा प्रकार पुढे आला आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर जंगलातून धाराशिव जिल्ह्यातील येडशी अभयारण्यात आलेल्या वाघोबाचा वावर धाराशिव आणि बार्शी तालुक्यातील सीमावर्ती गावांमध्ये अनेक दिवसांपासून आहे. वाघोबाच्या धुमाकुळ घालण्यातून बार्शी तालुक्यातील उत्तर भागात मागच्या काही दिवसांपासून जनजीवन विस्कळीत झाले आहे. वाघाबद्दल नागरिकांच्या मनामध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण आहे.

बार्शी तालुक्यातील मुंगशी (आर) परिसरात दोन दिवसांपूर्वी वाघाने धुमाकुळ घालत गाईच्या वासरावर हल्ला केल्याची घटना घडली होती. तथापि, ही घटना ताजी असतानाच, याच तालुक्यातील वैराग जवळच्या राळेरास शिवारात पट्टेदार वाघ आल्याचा बोभाटा झाला. या गावच्या शिवारात ओढ्याजवळ त्याचे ठसे आढळून आले. शिवाय सासुरे येथील श्री आवरे यांच्या म्हशीचे रेडकु गायब झाल्याचे निर्दशनास आले आहे. राळेरास आणि सासुरे येथील तरुणांनी शेत शिवार धुंडाळून काढत पाहणी केली. सासुरे शिवारात आवारे यांच्या शेताजवळ एका दगडावर रक्ताचे डाग दिसून आले तसेच पावलांचे ठसेदेखील आढळून आले.

राळरास येथील ओढ्याजवळ मेजर बाजारे यांना सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास वाघाचे ठसे दिसून आले. त्यांनी पोलीस पाटील गणेश पाटील यांना संपर्क साधून माहिती दिली. ठश्यांचे फोटो बार्शी वन विभागच्या अधिकाऱ्यांना पाहणीसाठी पाठवले. संबधित ठसे हे वाघाचेच असल्याचे या अधिकाऱ्यांनी सांगितले.

मेजर बाजारे यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, राळेरास आणि सासुरे येथील नागरिकांनी मिळून बुधवारी (ता.८) शोध घेतला. सासुरे तसेच राळेरास शिवारात वाघाचे ठसे आढळून आले आहेत. सासुरे शिवारात दगडावर रक्ताचे डाग दिसून आले. बार्शी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना संपर्क केला. त्यांच्याकडून योग्य उत्तरे मिळाली नाहीत.त्यांच्याकडून टाळाटाळ होत आहे, असे वाटते. रेडकू गायब झाले आहे, शिवाय वासराचा फडशा पाडला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाने तातडीने उपायायोजना करण्याची गरज आहे.

-गणेश पाटील, पोलीस पाटील, राळेरास, ता. बार्शी

बिन लग्नाच्या तरुणांचा 'स्पा-सेंटर'मध्ये राबता!

तरुणाईला मसाज सेंटरची चटक तरणी पोरं दलदलीत !

- 'स्मार्ट सिटी'त मसाज पार्लरच्या आडून वेश्या व्यावसाय जोमात
- कारवाईचे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध खाते कोमात

✔ **सोलापूर/खास प्रतिनिधी**

स्मार्ट सिटी म्हणून नावारुपाला आलेल्या सोलापूरच्या अनेक भागात स्पा सेंटर म्हणजेच मसाज पार्लरच्या आडून बिनधास्तपणे वेश्या व्यवसाय चालवला जात आहे. महाराष्ट्रासह इतर ठिकाणच्या तरुणींना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्या शरीर विक्रीचा अक्षरश:धंदा मांडला गेलाय. सोलापूरची तरुणाई जणू रतीब घातल्याप्रमाणे स्पा सेंटरमध्ये हजेरी लावत आहे. शहरात मसाज पार्लरच्या आडून वेश्या व्यावसाय जोमात तर कारवाईचे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध खाते कोमात असल्याची चर्चा होत आहे. नुकतीच मिसरुड फुटलेली तरणीबांड पोरं स्पा सेंटरच्या माध्यमातून वासनेच्या दलललीत फसत आहेत. बिगर लग्नाच्या पोरांचाच सर्वाधिक राबता स्पा सेंटरमध्ये असल्याची माहिती समोर आली आहे.

सोलापूर शहरानजिक बाळे, जुळे सोलापूर परिसरातील डी मार्ट ते भारती विद्यापीठ रस्ता, नवी पेठ परिसर, मुराराजी पेठ रेल्वे स्टेशन रस्ता परिसर, निलम नगर परिसर, कर्णिकनगर अक्कलकोट रोड आदी ठिकाणांसह उच्चभ्रू सोसायट्यांच्या भागात विविध प्रोफेशनल नावाने स्पा म्हणजे पुरुषांचे मसाज सेंटर चालविले जात आहेत. नियमाने मसाज सेंटर चालविले जात आहेत, असा दिखावा केला जात असला तरी अनेक सेंटरमधील आतील वास्तव पूर्णपणे वेगळेच असल्याचा बोलबाला आहे.

मसाज करण्यासाठी मुंबई, पुणे, नागपूर या मेट्रो सिटींसह कोलकत्ता, बांगलादेश, नेपाळ या ठिकाणाहून मुली आणि महिला येथील मसाज सेंटरमध्ये आणण्यात आल्या आहेत, त्याच शरीर विक्रीचा धंदा येथे करीत असल्याची चर्चा आहे. मोठ्या कमाईचे आमिष दाखवून त्यांना शरीर विक्रीच्या धंद्याला लावत मसाज पार्लर चालक या व्यावसायातून गंबरगंड होत असल्याचादेखील कळतं.

मसाज सेंटरची चटक लागलेले तरुण पुन्हा पुन्हा आपल्या मसाज सेंटरमध्ये यावेत, यासाठी चालकांकडून सेंटरमधील मुली आणि महिला यांची अदलाबदल केली जात आहे. शरीर सुखासाठी चटावलेल्या तरुणांना त्यांच्या पसंतीनुसार मुली पुरविताना स्पा सेंटर चालकांनी नेटवर्क तयार केले असून सेंटरमध्ये नव्याने मुली किंवा महिला आणल्यास तरुणांना त्यांच्या मोबालवर फोटो पाठवले जात आहेत. मुलींची भूरळ पाडून तरुणांना स्पा सेंटरची चटक लावण्याचा प्रकार सुरु आहे.

मुली पुरविणाऱ्या दलालांची टोळी

स्पा सेंटरमध्ये त्याच त्या मुली आणि महिला कायम ठेवल्यास गिऱ्हाईक येत नाही. त्यामुळे मुली आणि महिला सतत बदलल्या जातात. स्पा सेंटरला मुली आणि महिला पुरविणाऱ्या पुणे, मुंबईत दलालांच्या टोळ्या आहेत, त्या टोळ्या वय, देखणेपण, सर्व्हिस याआधारे दर ठरवून मागणीप्रमाणे मुली तसेच महिला पुरवतात, अशी चर्चा स्पा सेंटर चालकांच्या विश्वात आहे.

... म्हणे पहिली पान-सुपारी मालकाला

महाराष्ट्रासह बाहेरील राज्यामधून अथवा देशातून जेव्हा मुली किंवा महिला स्पा सेंटरमध्ये येतात. तेव्हा स्पा सेंटरचे काही मालक किंवा मॅनेजर यांची त्यांना पहिल्यांदा मसाज सेवा करावी लागते. त्यांना अगोदर पान-सुपारी द्यावी लागते, ही पान-सुपारी मसाज सेंटरमध्ये काम दिल्याच्या बदल्यात फुकटच असते. स्पा सेंटर मालक किंवा मॅनेजरच्या मर्जीनुसार, अधूनमधूनदेखील पान-सुपारी द्यावी लागते, अशी चर्चा मसाज सेंटरच्या विश्वात चवीने चर्चिली जाते.

बिगर लग्नाच्या नवरदेवांचा स्पा सेंटरमध्ये राबता

सामाजिक चिंता; पण मुली, स्पा सेंटर मालकांना खुशी

सोलापुरातील एका सामाजिक संस्थेने शहरातील स्पा सेंटरबाबत माहिती मिळविली. त्यामध्ये विविध कारणांमुळे ज्यांचे लग्न होत नाही, अशा बिगर लग्नाचे तरुण अधिकाधिक संख्येने स्पा सेंटरमध्ये येत आहेत, असे चित्र समोर आले. उपवर मुलांची लग्न होत नाहीत, ही मोठी सामाजिक समस्या आहे, मात्र दुसरीकडे लग्न न झालेले तरुण वासनेची आग शमविण्यासाठी स्पा सेंटरमध्ये

'बार-बार' येत आहेत. यातून मोठी कमाई होत आहे. याची मोठी खुशी मसाज सेंटरमधील मुली, महिला तसेच सेंटरचे मालक यांना असल्याचे विदारक पण वास्तव चित्र राहात आहे.

म्हणे रोजची कमाई २५ हजारांपर्यंत, पण व्यसने अन् मित्राच्या अय्याशीवर उडतात पैसे

सोलापूरच्या स्पा सेंटरमधील अनेक मुलींची दिवसभराची कमाई साधारण २५ हजारपर्यंत जाते. पण या मुलींना भारी व्यसने आहेत, शिवाय त्यांचे जे खास मित्र आहेत, त्या मित्रांची ऐश यावर त्यांची कमाई जाते. त्यांच्याकडे शिल्लक बँक बॅलन्स तितकासा असत नाही, अशीदेखील चर्चा स्पा सेंटरच्या विश्वात आहे.

शहर-जिल्ह्यासह सीमावर्ती भागातील तरुण स्पा सेंटरमध्ये

शरीर सुखासाठी चटावलेल्या तरुणांना त्यांच्या पसंतीनुसार मुली स्पा सेंटरमध्ये पुरवल्या जात आहेत, त्यामुळे मुख्यत्वे, सोलापूर शहर जिल्ह्यासह या जिल्ह्याच्या सीमावर्ती कर्नाटक आणि आंध्रप्रदेश राज्यातील तरुणदेखील सोलापुरच्या स्पा सेंटरमध्ये येत आहेत.

एंट्री फी १५०० रुपये, नंतरचा 'मामला' वेगळाच

सोलापुरात विविध नावाने चालविल्या जाणाऱ्या स्पा सेंटरमध्ये एंट्री फी १५०० ते २००० रुपये आहे. मसाजचे दर वेगवेगळे आहेत. शिवाय 'स्पेशल' सर्व्हिसचे चार्ज वेगवेगळे आहेत. त्याचा दर सर्व्हिसनुसार साधारण तीन ते वीस हजारांपर्यंत असल्याचा बोलबाला आहे.

स्पा सेंटरमधील मुली लॉजेस्मध्येसुद्धा

सुरवातीला स्पा सेंटरमध्ये तरुण आल्यानंतर त्याची तिथे मुलगी किंवा महिलेसोबत ओळख होते. ही ओळख वाढत गेल्यानंतर घसट निर्माण होते. स्पा सेंटरमध्य दोघांना खूप वेळ एकत्र थांबू दिले जात नाही. त्यातूनही थांबायचेच म्हटले तर अर्ध्या -पाऊण तासाला १२०० ते १५०० प्रमाणे रेट लावला जातो. जास्त वेळ थांबायचे म्हटले तर खूप पैसे लागतात. त्यामुळे ओळखीच्या मुलीला किंवा महिलेस लॉजेस्वर घेऊन जाण्याचे प्रकार वाढल्याचीदेखील माहिती पुढे येत आहे. सुट्टीच्या नावाखाली स्पा सेंटरला दांडी मारुन मुली लॉजेवरतील ओळखीच्या गिऱ्हाईकासोबत जात असल्याची चर्चा आहे.



इंग्रजीमधील पाट्या अन् लक्ष न जाणाऱ्या जागा

सोलापूरमधील स्पा सेंटर हे भर रस्त्यांवर चालविले जात असले तरी अनेक मजली इमारतींमध्ये अगदी वरच्या मजल्यावरील जागेत मंद प्रकाशात चालविले जात आहेत. या स्पा सेंटरच्या नावाचे फलक हे इंग्रजीमधून आहेत. इंग्रजी भाषेमधील फलक आणि कोणाचे सहज लक्ष जाणार नाही, अशा थोडाशा दूर्लक्षीत जागांमध्ये स्पा सेंटर चालविली जात आहेत. त्यामुळे त्यांचा बोभाटा जास्त होत नाही, हे येथील स्पा सेंटरचे वास्तव सांगितले जाते.

बरूर येथे ट्रॅक्टरखाली चेंगरुन अविवाहीत तरुण ठार

✔ **सोलापूर :** पाठीमागे येणाऱ्या ट्रॅक्टरखाली चेंगरून १९ वर्षीय तरुण गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मरण पावला. हा अपघात बरुर (ता.दक्षिण सोलापूर) येथे मयताच्या घराजवळ बुधवारी दुपारच्या सुमारास घडला.

गुंडूराव विठ्ठल हत्तळी (वय १९ रा. बरूर ता.दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. तो बुधवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास गावातील घरासमोरून पायी निघाला होता. त्यावेळी समोरून पाठीमागे येणारा ट्रॅक्टर त्याला धडकल्याने तो खाली कोसळला. ट्रॅक्टर न थांबता तसेच मागे आल्याने तो चाकाखाली चेंगरू गंभीर जखमी झाला होता. त्याला बेशुध्द अवस्थेत महासिध्द हत्तळी (मामा) यांनी सोलापूरातीत शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

मयत गुंडराव हत्तळी हा अविवाहित असून तो शेती व्यवसाय करीत होता. त्याच्या पश्चात आई-वडील २ भाऊ आणि २ बहिणी असा परिवार आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



खुर्ची नसली तरी त्यांनी 'तरतूद' करून ठेवलीय !

कल्याण
358-60-127

मुंबई
155-14-130

शरद पवारांच्या खासदारांशी संपर्काची चर्चा; अजित पवार दिल्लीत दाखल

✔ **नवी दिल्ली**

राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बुधवारी दुपारनंतर दिल्लीत दाखल झाले आहेत. दिल्लीत पोहोचल्यानंतर अजित पवार यांनी राष्ट्रवादीचे नेते आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या निवासस्थानी भेट दिली. अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार आपल्याकडे खेचण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची चर्चा रंगत आहे.

सुप्रिया सुळे आणि शरद पवार यांना वगळून इतर खासदारांनी आमच्यासोबत यावे, असं आवाहन राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केल्याची चर्चा रंगत आहे. याबाबत अद्याप अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून अधिकृत भाष्य करण्यात आले नसले तर सोनिया दुहान यांनी आमच्यातील काही खासदारांना संपर्क केल्याची माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमर काळे यांनी दिली आहे. आम्ही अजित पवार गटात प्रवेश करावा यासाठी सोनिया दुहान यांनी आमच्याशी संपर्क साधला होता. सध्याची राजकीय परिस्थिती पाहता विकासकामं करायची असतील तर एनडीएसोबत जाण्याशिवाय पर्याय नाही, असा सल्ला त्यांनी दिला होता, असे अमर काळे यांनी सांगितले. तसेच माझ्याशीच नाही तर निलेश लंके, भास्कर भगरे, धैर्यशील मोहिते पाटील, बजरंग सोनावणे यांच्याशीही त्यांनी संपर्क साधला होता, असा दावा काळे यांनी केला आहे.

भाजपकडून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची तयारी सुरू

✔ **सोलापूर/प्रतिनिधी**

महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका कधी होणार याची उत्सुकता सर्व इच्छुकांना लागली आहे. सुप्रिम कोर्टात याबद्दल तारखावर तारखा पडत आहेत. असे असताना आगामी काही महिन्यात या निवडणुका होतील असे गृहित धरत सोलापूर शहर आणि जिल्ह्यात भाजपच्या आमदारांकडून तयारी सुरू झाल्याचे दिसत आहे.

या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या न्यायालयाच्या आदेशावर अवलंबून आहेत. मात्र नेत्यांनी निवडणुका कधीही लागल्या तरी त्याची आतापासूनच तयारी सुरू केली आहे. भाजपाचे आमदार सुभाष देशमुख यांनी निवडून आल्याबद्दल सत्काराच्या निमित्ताने गावभेटी, प्रभागवार भेटी सुरू आहेत. त्यांच्या गाठीभेटीतून त्या त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा आढावा घेतला जात आहे. दुसरीकडे शहरातील आमदार विजय देशमुख आणि आ. देवेंद्र कोठे हे सदस्य अभियान नोंदणी राबवून तयारी करताना दिसत आहेत. त्यांनी काही प्रमुख कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेत नेत्यांनी संपर्क मोहीम वाढविली आहे. कार्यकर्त्यांच्या कार्यक्रमांना भाजपाचे आमदार न चुकता उपस्थित राहात आहेत. एकेकाळी काँग्रेस व राष्ट्रवादीचे वर्चस्व असलेल्या जिल्ह्यावर आता महायुतीचा कब्जा आहे. सोलापूर लोकसभा निवडणूक जरी काँग्रेसने जिंकली असली तरी सोलापूर लोकसभा क्षेत्रात येणाऱ्या सहा पैकी पाच विधानसभा क्षेत्रात भाजपाचे आमदार आहेत.त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत भाजपाचे पारडे जड राहणार आहे. दुसरीकडे विधानसभेला जरी पराभव झाला असला तरी स्थानिक पातळीवर आपलेच वर्चस्व असल्याचे सिध्द करण्याची संधी महाविकास आघाडीच्या नेत्यांना आहे. प्रत्येक निवडणुकीचे समीकरण वेगळे असते याची जाणीव नेत्यांना असते यातुनच तयारीला वेग आला आहे. महाविकास आघाडीला पराभवाचा कलंक पुसून टाकायचा आहे; तर महायुतीला आपले वर्चस्व अबाधित ठेवायचे आहे.

भाजपपुढे वेगळेच संकट

भाजपमध्ये होणारे इनकमिंग आमदारांना पुढे डोकेदुखीही ठरण्याची शक्यता आहे. नव्यांना पक्षात घेण्याच्या नादात जुन्यांकडे दुर्लक्ष झाल्यास मोठा गोंधळ उडण्याची शक्यता आहे.

महाआघाडीत आलबेल नाही

एका बाजूला भाजपाची सदस्य नोंदणी अभियानातून निवडणुकांची तयारी सुरू असताना महाआघाडीत काही अलबेल दिसेनासे झाले आहे. सोलापुरात ठाकरे गटानेच यापूर्वीस महापालिका स्वतंत्र्य लढण्याची घोषणा केली आहे. शरद पवार गटाचे नेतेही स्वबळाची भाषा करत आहेत. काँग्रेसचे नेते अद्यापही ईव्हीएमवर खापर फोडण्यात मग्न आहेत.

सदस्य अभियानाच्या माध्यमातून आमदारांच्या गाठीभेटी